# ॥ अध्याय नववा ॥

## ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥

श्रीगणेश-सरस्वत्यै नमः ॥ श्रीसद्गुरवे नमः ॥ ॥ गुरु म्हणती सच्छिष्यासी । शुभचित्तसावधानेंसीं । श्रीमन्नृसिंहसत्कीर्तीसी । श्रवण करीं या सर्वदा ॥ १ ॥ प्रख्यात नारायणसरोवर । श्रीकृष्णत्रिविक्रम-क्षेत्र । कच्छ-देशीं द्वारकेहूनि दूर । मनोहर विराजे ॥ २ ॥ कृष्णत्रिविक्रमाचें मंदिर । शोभायमान असे सुंदर । तीर्थ वापी उदक शुभ्र । त्रिविक्रमासंनिध असे तें ॥ ३ ॥ ग्राम लहान परी शोभिवंत । तेथें यात्रेसी प्रेमयुक्त । द्वारकेहूनि लोक समस्त । जलपादमार्गें जाताति ॥ ४ ॥ त्या नारायणसरोवर ग्रामीं । सहज गेले नृसिंहस्वामी । लोकानुग्रही स्मरणगामी । सेवकासहित मंदिरीं ॥ ५ ॥ त्या मंदिराचे स्थानाधिपति । एक साधु महाराज असती । वापींत स्नान जे जे करिती । दक्षिणा देती ते महंतासी ॥ ६ ॥ ते स्थानाधिपति अभिमानी । दक्षिणादिक घेतल्यावांचूनी । वापीस्नान जनालागूनी । करूं न देती धनावीण ॥ ७ ॥ त्या महंताचे शिष्य चार जण । वापींत करूं न देती प्रवेशन । म्हणती यात्रेसी धनविहीन । कां येतां हो दरिद्री ॥ ८ ॥ द्रव्य नसतां तुमचे गांठीं । कां हिंडतां हो तीर्थकांठीं । येथें आमची वृत्ति मोठी । तीर्थकरदंड घेतसों ॥ ९ ॥ ऐसे कामलोभी उद्दंड । बोलती तीर्थक्षेत्रस्थ गुंड । नृसिंहमुनीश्वर वितंडबंड । पाहूनि हांसती गदगदा ॥ १० ॥ मग नृसिंहयतिवर्य सेवकांसहित । उड्डाण करूनि गगनांत । उतरले वापींत् अकस्मात् । करिती स्नान निर्भयें ॥ ११ ॥ योगसामर्थ्य पाहूनि अपूर्व । भयभीत झाले मग सर्व । वापींत उतरूनि हतगर्व । नमन करिती दुरूनी ॥ १२ ॥ उदकावरी नृसिंहमुनि । निराधार बैसले सिद्धासनीं । चार पुरुष इतुकें पाणी । भरलें होतें वापींत

॥ १३ ॥ उदकावरी वितस्तिप्रमाण । आसनीं स्थित उमारमण । अहोरात्र अब्धोदकावीण । स्वानंदीं निमग्न होते ते ॥ १४ ॥ शिष्यांसहित वृद्धसाधु । म्हणती समर्थांसी दीनबंधु । क्षमा असावी करुणासिंधु । महदपराधी आम्हांसी ॥ १५ ॥ जन्म गेला धनलोभांत । बहुत मिळतां नव्हे तृप्त । मंद, नोळखिले भगवंत । संत महंत विद्वज्जन ॥ १६ ॥ जैसे स्मशानांतील गृध्र काक । पिंडादि भक्षिती श्वानादिक । तीर्थक्षेत्रस्थ आम्ही लोक । लोभी निर्लज्ज संस्थानीं ॥ १७ ॥ मार्गी तस्कर सर्वस्व लुटिती । सोडिती मारिती जीव घेती । त्यापरीच आमुची वृत्ति । मोठे दुर्मति आम्ही असों ॥ १८ ॥ तस्करांहूनि गुंड अधिक । उघडपणें वित्तापहारक । बाह्यरंग निर्लोभ दांभिक । संभावितपणें वर्ततों ॥ १९ ॥ टिळेमाळादि वेषधारी । नाममात्र साधु ब्रह्मचारी । म्हणवितों तथापि दुराचारी । कपटी पापी लोभिष्ट ॥ २० ॥ देवासंनिध आम्ही असतों । नित्य देवाची सेवा करितों । परी निशिदिनीं धन अपहारितों । भय न मानितों ठाकुरजीचें ॥ २१ ॥ धनलोभें सेवेसी दुर्लक्ष । दुष्कर्म आचरितों देवासमक्ष । मोठे श्रीमंत धनिकांचे पक्ष । धरितों द्रव्यार्थ सतत ॥ २२ ॥ जैसे गौस्तनींचे गोचिड । नसे तयांसी दुधाची चाड । रक्त प्राशुनि पुष्ट जाड । होती द्वाड पीडक ॥ २३ ॥ गौवत्स करिति दुग्ध स्तनपान । तेणें दुग्धलाभ घेती जन । परी गोचिड माजले रक्त प्राशून । निर्दय पीडिती स्तनांसी ॥ २४ ॥ गोचिडांचें उदरभरण । गौस्तनींच होतसे जाण । ऐसें असतांही विनाकारण । सात्त्विक धेनूसी पीडिती ॥ २५ ॥ ज्याचें जन्मभरी खावें प्यावें । त्याचेंचि समूळ छेदावें । दुष्ट दुर्बुद्धि खल स्वभावें । अति कृतघ्न असती ते ॥ २६ ॥ ज्यांनीं पाळिलें सदोदित । त्यांच्याचि नाशास होती प्रवृत्त । नोळखिती स्वकीय आप्त । खल उन्मत्त धनलोभी ॥ २७ ॥ आम्ही छलक गोचिडासमान । नित्य करितों हरिसेवन । सकामनिक अशुद्ध मन । दुर्वर्तन आमचें ॥ २८ ॥ आपणासारिखे योगाधीश्वर । निंदुनी केला तिरस्कार । ताडिलें वाग्बाणें निष्ठुर । आम्ही पामर अन्यायी ॥ २९ ॥ आमचा सच्छिष्य विचारी । राधाकृष्ण



ब्रह्मचारी । ज्याचा विश्वास मंदिरीं भारी । तोही भ्रमें व्यापिला ॥ ३० ॥ आमची 'साठी बुद्धि नाठी' । हातीं घेऊनियां काठी । श्वानवत् गुर्गुरूनि पाठीं । वसवसां लागतों लोकांचे ॥ ३१ ॥ आमचे गुरु विशुद्धानंद । तेचि आपण दिसतां निर्विवाद । बहुतकाल दर्शनार्थ खेद । वाटतां गोविंद प्रगटलां ॥ ३२ ॥ पुत्रापराधांचा खेद । माता कदां न मानी निर्विवाद । त्याहूनि श्रेष्ठ आपण करुणाकंद । ब्रह्मानंद सद्गुरु ॥ ३३ ॥ आतां मंदिरांत चलावें । अपराध सर्व क्षमा करावे । दीनजनोद्धारका उठावें । पतितपावना नरसिंहा ॥ ३४ ॥ मग राधाकृष्ण ब्रह्मचारी । उतरला तीर्थोदकाभ्यंतरीं । साष्टांग नमनें पाय धरी । उठावें म्हणे विश्वेश्वरा ॥ ३५ ॥ नरसिंह परमात्मा दयाळ । पाहूनि अंतःकरण विमल । उदकावरूनि चालत तात्काल । आले मंदिरीं सकलांसह ॥ ३६ ॥ अनन्यभावें उत्तमासनीं । बैसविले श्रीनृसिंहमुनि । पुष्पहार सुगंध चंदनीं । नीरांजनीं पूजिले ॥ ३७ ॥ करिती देवाची आरती । चक्रपाणी ओंवाळिती । पंचपदी भजन सुस्वरें गाती । नाचती समताल तेथवां ॥ ३८ ॥ मधुर वाद्यें वीणा मृदंग । झर्झरी झंझन वाजती चंग । एकत्वें व्यापिला निजरंग । सत्संगमहिमा अगाध ॥ ३९ ॥ भजन आटोपल्यानंतर । स्वल्प झाला फलाहार । मग निद्रिस्त होती सर्वत्र । आनंदरूपीं मिळाले ॥ ४० ॥ प्रभातकालीं सगळे उठून । करिती शौचमुखमार्जन । भगवच्चर्चा नामस्मरण । स्नानादि कर्म अटोपिती ॥ ४१ ॥ देवासी समर्पूनि नैवेद्य । लेह्य पेय चोष्य खाद्य । नृसिंहमूर्ति जगद्वंद्य । भोजनीं बैसले समंडळ ॥ ४२ ॥ त्यांमधीं एक अरण्यपंडित । पढतमूर्ख मनीं जल्पत । आकाशमार्गें उडोनि वापींत । कोणत्या साधनें पातले ॥ ४३ ॥ जलावरी वितस्ति प्रमाण । कवण योगें साधिलें आसन । पाण्यावरूनि चालणें कठिण । विलक्षण हें वाटतसे ॥ ४४ ॥ हें गारूड अथवा इंद्रजाल । किंवा मणि-मंत्रौषधि केवल । यंत्रतंत्राचें भांडवल । कसें काय तें कळेना ॥ ४५ ॥ नेत्रीं अंजन मुखीं गुटिका । औषधी-मर्दित पादुका । कोणतें त्रोटक केलें चेटका । किंवा मायिक असेल हें ॥ ४६ ॥ वेदविहित कर्मानुष्ठान । कीं दशमहा-

विद्योपासन । किंवा त्रिलोह मुद्रिका वेष्टून । उड्डाणासन केलें हो ॥ ४७ ॥ महामंत्र-पुरश्चरण । अथवा आकर्षिला वायु प्राण । देवताबीज-मंत्रोच्चारण । साध्य असेल कीं काय ॥ ४८ ॥ शालिग्राम बाण वदनीं । सप्तशती सार्थ पढूनी । सिद्ध झाले होमहवनीं । कर्णी ठेवुनी कीलक ॥ ४९ ॥ गुप्त विमान जवळी अथवा । पूर्वपुण्य उग्र तपाचा ठेवा । उच्छिष्ट चांडाळी गणेश देवा । चंडी भैरवां आराधिलें ॥ ५० ॥ वशीकरण आणि मोहन । साधिलें असेल दृष्टिबंधन । कालज्ञान उचाटन स्तंभन । यक्षिणीसाधन असेल कीं ॥ ५१ ॥ जयकरण वाजीकरण । वटिका-औषधी-भक्षण । भूत प्रेत ग्रह पिशाचरक्षण । वेतालकर्म इत्यादि ॥ ५२ ॥ किंवा विजयादिक कल्प । अतिवाहिक सत्संकल्प । शाबरी वीरमंत्र कल्प । घृतें तैलें पाकादि ॥ ५३ ॥ तिथि वार नक्षत्र करण योग । ग्रह गणित फलित पंचांग । किंवा वेदमंत्र गायत्री-सिद्धांग । प्राप्त अव्यंग असेल ॥ ५४ ॥ किंवा तत्त्वज्ञान स्वरोदय । इडा पिंगला सुषुम्णा त्रय । ब्रह्मा विष्णु रुद्र देवता काय । साधिल्या स्वसामर्थ्यें ॥ ५५ ॥ छायापुरुषाचा अभ्यास । षण्मुद्रादिकांचा ध्यास । किंवा एकासनीं स्थितवास । अनायासें लाभला ॥ ५६ ॥ अथवा श्रीहट गोल्हाट । नीलबिंदु औटपीठ । जाणिलें असेल त्रिकूट । दशमद्वारीं गुरूसी ॥ ५७ ॥ अथवा प्राणायाम सम्यक् । रेचक पूरक कुंभक । नित्योपलब्ध कुंभक देख । सगर्भ साध्य जाहला ॥ ५८ ॥ मूलबंध उड्डाणबंध । तिसरा तो जालंदरबंध । देवतासह अप्रतिबंध । सिद्ध असेल प्राणायाम ॥ ५९ ॥ चतुराशीति अष्टांग । संसिद्ध असेल लंबिकायोग । चित्तवृत्ति निरोधअंग । राजयोग साद्यंत ॥ ६० ॥ षट्चक्र देवता हंसरूप । प्रश्वासनिःश्वासात्म अजपा-जप । एकवीसहजार सहाशें माप । जपिला असेल गुरुमार्गें ॥ ६१ ॥ किंवा जीवब्रह्मैक्य-अभेद । स्वात्मानुभविला सच्चिदानंद । लोकानुग्रहकाम्यार्थ स्वच्छंद । शक्तिपात केलासे ॥ ६२ ॥ ऐसे विप्रमनींचे संशय । निवृत्त व्हावया सर्वसंशय । अंतःसाक्षी श्रीदत्तात्रेय । जाणिती हृदय विप्राचें ॥ ६३ ॥ भोजनांतीं नृसिंहयोगी । वदती संशयी विप्रालागीं ।



कोणतीं साधनें उपयोगी । आम्हाजोगीं असती रे ॥ ६४ ॥ तुझें घोटाळलें अंतःकरण । कळेना आमुचें निराकरण । त्वरें करावें पृथक्करण । उदाहरण मांडावें ॥ ६५ ॥ अवघ्या लघु दीर्घ शंका । त्यांत भरला दगा धोका । समजून सांग रे पुराणिका । शास्त्रीबुवा आम्हांसी ॥ ६६ ॥ तूं जाणसी न्याय व्याकरण । आम्ही करितों भिक्षाटन । सिद्ध साध्य साधकपण । काय निराकरण जाहलें ॥ ६७ ॥ विकल्प संशयी अरण्यपंडित । ऐकूनि जाहला गर्भगळित । म्हणे हें अंतःसाक्षी महद्भूत । निःसंशय काय कीं ॥ ६८ ॥ सर्वसाक्षी द्रष्टा सर्वज्ञ । वेदवेदांगार्थविदुःप्राज्ञ । परमार्थस्वरूप अभिज्ञ । यज्ञस्वरूप एक विष्णु ॥ ६९ ॥ माझे मनांतील शंकासमुदाय । जाणते पुरुष महाशय । सर्वशक्ति सकलमत तात्पर्य । विश्ववर्य विज्ञानी हो ॥ ७० ॥ निर्गुण निर्विकल्प निरंजन । या महापुरुषाविषयीं कल्पना जाण । अज्ञानमदांध वाग्जल्पन । करणें सर्वथैव अयोग्य ॥ ७१ ॥ अत्यंत पवित्र पुण्यपुरुष । अविद्या-मायातीत निर्दोष । परब्रह्म अद्वितीय निर्विशेष । साक्षात् निश्चयें असती हें ॥ ७२ ॥ अविद्या-अज्ञान-भ्रमित । आम्ही अहंकारी मदोन्मत्त । आंधळे झालों विषयासक्त । नोळखिले अनंत जगद्गुरु ॥ ७३ ॥ जे पूर्णपरमात्मावतार । सर्वशक्तिमान् अखंड दयासागर । त्यांसी दोष लावणें याहूनि भयंकर । अघोर पातक कोणतें ॥ ७४ ॥ म्हणून महापुरुषाविषयीं । कोणत्या प्रकारें कोणत्याही समयीं । सर्वथा दोषदृष्टि दुःखमयी । सहसाही नसावी ॥ ७५ ॥ सेवा करणें राहिलें बाजूस । वृथा निंदा चेष्टा उपहास । सहज वाटे परी दुःखास । सर्वपरी कारण असे ॥ ७६ ॥ भोजनसमयीं दुर्विचारी । बुडालों होतों विकल्पसागरीं । सहज गुरुदर्शन क्षणभरी । होतांचि विकार निमाले ॥ ७७ ॥ मी कुचेष्टित असतां खळ । भोजनीं संस्कार प्राप्तकाळ । महद्दर्शनें संशय-विटाळ । फिटले क्षण न लागतां ॥ ७८ ॥ स्वामीसमर्थ योगींद्रिं आज । अपराधी असतां मी द्विज । तथापि आपणासारिखें मज । करूनि निजगुज दाविलें ॥ ७९ ॥ म्हणे परमपुरुषा योगींद्रा । भक्तवत्सला दयासमुद्रा । विधिनारायणा महारुद्रा ।

भवदरिद्रांतक अससी तूं ॥ ८० ॥ धन्य धन्य सामर्थ्य विशाल । सोडविशी भवबंध जाल । तूं अव्यय कालाचाही काल । लीलाविग्रही शोभसी ॥ ८१ ॥ बहुत देवही नवसले । तथापि ते न गवसले । अंतर्यामीं ब्रह्मतत्त्व वसलें । तेंचि दिसलें स्पष्ट मज ॥ ८२ ॥ अनेकवार लोटांगणा । शुद्धभावें घालित प्रदक्षिणा । म्हणे नृसिंहावतार नारायणा । कृतकृत्य झालों त्वत्कृपें ॥ ८३ ॥ दर्शन होतांचि कृतार्थता । लाधली ब्रह्मानंद-स्वरूपता । मम गृहीं चलावें आतां । पवित्र करावें कुटुंब सर्व ॥ ८४ ॥ मग नृसिंहमुनिसमवेत । सगळे पातले पंडितसदनांत । योगीश्वर सिंहासनस्थित । जाहले हर्षभरित समग्र ॥ ८५ ॥ धांवूनि आले भोळे भाविक । साष्टांग नमिती ग्रामलोक । म्हणती धन्यदिन मंगलदायक । यतिनायक प्रगटले ॥ ८६ ॥ आजि सहज गृहासि पाय । लागले जाहला भाग्योदय । जड मूढ आम्हांसी मायबाप । तरणोपाय आपणचि ॥ ८७ ॥ पूर्वसुकृतें महत्पादरज । आमच्या भालीं स्पर्शले आज । पदकमलें रक्तदिव्य सतेज । निर्मल तारक देखिलीं ॥ ८८ ॥ मग गंधाक्षता पुष्पालंकार । धूप दीप नीरांजन कर्पूर । फल तांबूलादि नारी नर । समर्पिती योगीश्वरातें ॥ ८९ ॥ गीत वाद्य घोष मधुर । गर्जती भक्त जयजयकार । आनंदवृत्ति हर्षनिर्भर । नृसिंहनामोच्चारिती ॥ ९० ॥ तेव्हां समर्थ पुसती पंडिता । कोठें तुझे मातापिता । विप्र वदे ते उभयतां । कैलासवासी जाहले ॥ ९१ ॥ गेले षट्त्रिंशति संवत्सर । पंचत्व पावले विमत्सर । आपल्या प्रश्नासि हेतु उत्तर । विदित नसे आम्हांसी ॥ ९२ ॥ उत्तर देती नृसिंहमुनि । त्वत्पिता असे तुझे सदनीं । पाळण्याची रज्जु धरूनी । झोके देतसे मुलासी ॥ ९३ ॥ पंडित न मानी विश्वास । म्हणे मेल्यासी वर्षे झालीं छत्तीस । कोणता जन्म असेल त्यास । जगन्निवास सांगा हो ॥ ९४ ॥ अंतर्साक्षी त्रिकालज्ञानी । भूत भविष्य वर्तमानी । संपूर्ण वृत्तांत ज्ञानचक्षूंनीं । जाणते आपण त्रयलोकीं ॥ ९५ ॥ नृसिंह वदती पहा घरांत । भुजंग होऊनि पाळण्यांत । निजलेल्या बालकासि रक्षित । झोंके देत ममतेनें ॥ ९६ ॥ वासना



राहिली म्हणून । सर्पयोनींत झालें जनन । वासनाक्षय झाल्यावांचून । सद्गति नसे प्राण्यासी ॥ ९७ ॥ मनोजय वासनाक्षय । अभ्यास-वैराग्ययोगें होय । ब्रह्मविद्याप्रवर्तक संप्रदाय । गुरूसी शरण रिघावें ॥ ९८ ॥ तात्पर्य वासनाविरहित । झाल्याविना न मोक्ष प्राप्त । वासनेमुळें सर्पयोनींत । उपजला तात तुझा हा ॥ ९९ ॥ वृद्धभुजंगाचे अंगासी धका । कोणीही लावूं नका । लावाल तरी दुःखशोका । अवश्य पावाल निश्चयें ॥ १०० ॥ कोणत्याही प्राणिमात्राचा वध । करूंचि नये हा शास्त्रनिर्बंध । सर्वभूतीं दया क्षमा अविरोध । असावी ऐसें शास्त्रें बोधिती ॥ १ ॥ घडला असतां अपराध । धर्मन्यायरीति यथासंबंध । जाणूनि निःपक्षपात शोध । उचित शासन असावें ॥ २ ॥ देशाचार लोकाचार । कुलाचार वृद्धाचार । जाणूनि शास्त्रविहित विचार । जें करणें तें करावें ॥ ३ ॥ न कळे तरी पुसावें वडिलांसी । विद्वान् श्रेष्ठ सद्गुरूसी । विचारावें सविनय आदरेंसीं । स्वहितार्थ जिज्ञासूंनीं ॥ ४ ॥ म्हणूनियां विनाकारण । भुजंगाचें न करावें छळण । जरी भुजंगास होईल स्फुरण । येईल धांवून आम्हांकडे ॥ ५ ॥ ऐकूनि श्रीगुरुमुखें सुनीति । पहावयासी सगळे उठती । मंद गतीनें भुजंगासी पहाती । म्हणती सत्य गुरुवाक्य ॥ ६ ॥ परस्पर बोलती वचन । तान्हें बालक असे लहान । यासी झालिया सर्पदंशन । प्राणहानि होईल ॥ ७ ॥ एक म्हणे कशास उशीर । करा सर्पप्राणसंहार । कोणी वदती महताज्ञानुसार । चालतां हितकर असे हो ॥ ८ ॥ दुसरा म्हणे परिसा युक्ति । सर्पासी करा कीं काकूलती । पालखांतून तान्ह्याप्रति । घ्यावें काढून हळूच ॥ ९ ॥ तिसरा वदे वाक्य परिसा । मूकजनावरांचा भरंवसा । त्यांतून विषारी यांचा न जाणावा सहसा । म्हणूनि यास वधावें ॥ ११० ॥ चवथा बोले पहातां काय विचारांत होतो कालक्षय । मुसळ घेऊनि याचा लय । करा निर्भय त्वरेनें ॥ ११ ॥ कित्येक म्हणती भुजंग गृहांत असतां होईल प्राणघात । यदर्थ मारणें योग्य निश्चित । अन्य खटपट कशास ॥ १२ ॥ काष्ठें आतां मारावें यास । ते

भुजंगें टाकिला प्रश्वास । बाहेर येऊनि नृसिंहश्रीपादास । नमिलें मरणभयास्तव ॥ १३ ॥ करीं घेऊनि त्या भुजंगासी ।
समर्थ वदती कां भीतोसी । तुझेचि पुत्रादि या समयासी । त्वत्प्राणहानीस प्रवर्तले ॥ १४ ॥ या कल्पितसंसारपरिग्रहीं ।
वासना दुःखास कारण पाहीं । तूं गृहधनपति असतां कांहीं । दया नाहीं हिंसकां ॥ १५ ॥ वासना अद्याप झाली तृप्त ।
कीं प्रपंच आवडी असे उर्वरित । मनोरथ परिणाम प्राणान्त । पुत्रादि हस्तीं होतसे ॥ १६ ॥ काय इच्छा असे मानसीं ।
तंव सर्प विनवी श्रीगुरूसी । नको नको संसारसुख मजसी । पावलों तृप्ति पुष्कळ ॥ १७ ॥ आतां सोडवा हो मायाजाल ।
चरणीं ठेवा मज चिरकाल । ऐसें वाचेनें स्पष्ट बोले व्याल । ऐकूनि सकल दचकले ॥ १८ ॥ सर्पासी घेऊनि योगीश्वर ।
त्वरें दाविती नारायणसरोवर । मुनीश्वरासंगें सर्वत्र । आले कौतुक बघावया ॥ १९ ॥ सर्पासी गुरु बोधिती वचन ।
या सरोवराचें घेतां दर्शन । एक जन्माचें दोषक्षालन । अवश्यमेव होतसे ॥ १२० ॥ सरोदका स्पर्श झाला असतां ।
त्रिजन्म पातक नाशे तत्त्वतां । स्नानें सहस्रजन्म दुरितां । क्षय होय निश्चयें ॥ २१ ॥ श्रीनारायणसरोदक । प्राशितां
बिंदुमात्र एक । दग्ध होय महापातक । कृतकृत्यता होतसे ॥ २२ ॥ सरसागरादिक-तीरीं । वसती जे नर पंचरात्रीं ।
तरूनि जाति संसारसागरीं । सत्य सत्य त्रिवाचा ॥ २३ ॥ तीर्थक्षेत्रांचें महिमान । ऐकूनि संतुष्टले जन । म्हणती देवा
प्रत्यक्ष नारायण । करितां पावन जगतासी ॥ २४ ॥ सर्पासी आज्ञापिती अवधूत । त्वरें स्नान करीं रे सरोवरांत । पुढती
येणें योगीकुलांत । जन्म पावशी मोक्षप्रद ॥ २५ ॥ नारायणसरोवरक्षेत्र । बिंदु पंपासरोवर पवित्र । मानसरोवरादिकीं
फल पत्र । दानें स्नानें पुण्यलोकप्राप्ति ॥ २६ ॥ भूवरी नारायणतीर्थासम । दुसरें नसे तीर्थ अनुपम । अमर इच्छिती
या क्षेत्रीं जन्म । अन्याची ती काय कथा ॥ २७॥ परिसूनि तीर्थमहिमा यश । भुजंग वंदूनी म्हणे हृषीकेश । भवार्णवतारक
तूं जगदीश । केलें पाशनिर्मुक्त ॥ २८ ॥ मी मूक हिंसक विषारी जनावर । तूं जगदात्मा करुणाकर । सर्वज्ञ सर्वशक्तिमान्



परमेश्वर । वाणी संस्कार दिधलासि ॥ २९ ॥ मजला दिधलें जीवदान । योगीकुलांत होईल जनन । न मागतां
ऐसें आशीर्वचन । प्रसन्नत्वें दिधलें त्वां ॥ १३० ॥ जन्मोजन्मींचे जननी जनक । तूंचि आमचा संरक्षक । केला दुरी
संसारशोक । पुण्यश्लोक गुरुवर्या ॥ ३१ ॥ ऐसें विनवूनि भुजंगम । नमस्कार करीत सप्रेम । सरोदकीं प्रवेशला परंधाम ।
योगीश्वरा चिंतूनि ॥ ३२ ॥ सर्वांसी वाटलें आश्चर्य । म्हणती धन्य श्रीगुरुज्ञानसूर्य । मग आचरूनि संध्यावंदनकार्य ।
गेले सर्वही स्वस्थलीं ॥ ३३ ॥ श्रीगुरुलीलामृत-सत्कीर्ति । सर्वत्र लोक सर्वदा गाती । धन्य धन्य योगीश्वर जगत्पति ।
भेटले येथें प्रख्यात ॥ ३४ ॥ ते भगवान् श्रीस्वामी समर्थ । जेथें वसती तेंचि क्षेत्र तीर्थ । जनांसी लागावा योग्य सत्पंथ ।
स्वार्थ परमार्थ साधावा ॥ ३५ ॥ एतदर्थ विश्वकुटुंबी नृसिंहमुनि । वास्तविक निरुपाधिक असूनि । परोपकारार्थ संचरती
भुवनीं । दयानिधि सदाशिव ॥ ३६ ॥ महंताच्या उजव्या हातां । श्वेतकुष्ट व्याधि होता । तो श्रीमन्नृसिंहचरण स्पर्शतां ।
गेला तात्काळ तयाचा ॥ ३७ ॥ नारायणसरोवरींचा वृत्तांत । ब्रह्मचारी राधाकृष्णादि महंत । यांनीं निवेदिला
इत्थंभूत । तोचि येथें कथियेला ॥ ३८ ॥ कांहीं नव्हे पदरचें एक । वदविता सत्य प्रामाणिक । स्वामीसमर्थ निश्चयात्मक ।
निःसंशय जाणावें ॥ ३९ ॥ पुढिले अध्यायीं रसिक कथन । श्रोतीं असावें सावधान । अपार अनंत लीलावर्णन ।
त्याचा तोच वदवील ॥ १४० ॥ स्वस्ति श्रीगुरुलीलामृत । वेदशास्त्रपुराणसंमत । ब्रह्मनिष्ठ वामनविरचित । नवमाध्याय
गोड हा ॥ ९ ॥ इति श्रीगुरुलीलामृते गुरुशिष्यसंवादे नवमोऽध्यायः समाप्तः ॥ श्रीगुरुदेवदत्त–स्वामीसमर्थ ॥ ॥